# प्राचार्य मोहन खताळ यांचा सत्कार

देगलूर (म.नेता)

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांचे रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर माननीय कुलगुरू डॉ.उद्धव भोसले सरांनी नामनिर्देशित केले आहे. त्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार सोहळा महाविद्यालयात आयोजित करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमात विचारपीठावर संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे कार्यकारिणी मंडळ सदस्य जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा



द्याडे उपस्थित होते.याप्रसंगी संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा.उतमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी सत्कार केला. यावेळी सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए.आर.डांगे तर आभार प्रा.संग्राम पाटील यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner